संपादकीय

दैवतावरून राजकारण

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत, महाराष्ट्राची अस्मिता आहेत, मराठी माणसाच्या मनात आणि रोमारोमांत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, त्यांचे विचार आणि आचार भिनलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि जय भवानी - जय शिवाजी या घोषणा म्हणजे मराठी माणसांचा ऊर्जा स्त्रोत आहेत, अशा महापुरुषाचा पुतळा कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील म ालवणला राजकोट किल्ल्यावर कोसळून पडतो या घटनेने तमाम मराठी माणसाला वेदना झाल्या आहेत. पण या घटनेला जबाबदार कोण, दोषी कोण याचा वेगाने शोध घेण्याऐवजी राज्यातील राजकीय पक्ष व त्यांचे नेते एकम ेकांवर सुसाट चिखलफेक करीत सुटले आहेत. राज्यातील विधानसभा निवडणूक दिवाळीच्या सणानंतर अपेक्षित आहे, म्हणूनच राजकीय लाभ पदरात पाडून घेण्यासाठी राजकीय पक्षात स्पर्धा सुरू झाली आहे. महायुती सरकारला कोंडीत पकडण्यासाठी, महायुती सरकारची बदनामी करण्यासाठी, शिंदे-फडणवीस नि अजितदादांना धारेवर धरण्यासाठी म हाराजांचा पुतळा हा मुद्दा विरोधी पक्षांकडून तेवत ठेवला जातो आहे. छत्रपतींचा पुतळा कोसळला याला सर्वस्वी महायुतीचे सरकार जबाबदार आहे, असे गृहीत धरून महाआघाडीने एकनाथ शिंदे सरकारवर हल्लाबोल केला आहे. गेल्या वर्षी ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनाच्या निमित्ताने राजकोट किल्ल्यावर छत्रपती महाराजांचा पुतळा उभारण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण केले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन केंद्रीयमंत्री नारायण राणे अशा दिग्गजांच्या उपस्थितीत हा शानदार सोहळा संपन्न झाला. पण आठ महिन्यांत ३५ फूट उंचीचा हा पुतळा कोसळला. महाराष्ट्रात यापूर्वी असे कधी घडले नव्हते.म हाराजांचा पुतळा कोसळल्यावर संपूर्ण राज्यात जनतेला संताप आला. जे दोषी आहेत, त्यांना भर चौकात चाबकाने फोडले पाहिजे अशी प्रतिक्रिया प्रकट झाली. पण जनतेने मनावर संयम राखला. कुठेही संताप व्यक्त करण्यासाठी तोडफोड झाली नाही. हिंसाचार झाला नाही. पोलिसांना कुठेही बळाचा वापर करावा लागला नाही. पण राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मात्र ताळतंत्र सोडल्यासारखे वर्तन केले. आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले. शिल्पकार म्हणून जयदीप आपटे व स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून चेतन पाटील यांची निवड कोणी व कशाच्या आधारावर केली? शिल्पकाराचा अनुभव काय? पस्तीस वर्षांच्या तरुणाला एवढे मोठे काम कसे दिले गेले? मालवणला महाराजांचा पुतळा उभारण्याच्या कामात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाला, असेही महायुती सरकारवर विरोधकांनी आरोप केले. विरोधी पक्षाने थेट सार्वजनिक बांधकाम खात्यावर खापर फोडले व मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या राजीनाम्याची मागणी केली. महाराजांचा पुतळा शासनाने नव्हे तर नौदलाने बसवला असे स्वत: मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यामुळे या दुर्घटनेला नेमके कोण दोषी आहेत याचे गूढ वाढले. ताशी ४५ किमी वेगाने वारे वाहत असताना हा पुतळा कोसळून पडला अशी माहिती राज्य सरकारने दिली पण त्यावर विश्वास कसा ठेवायचा?शिवरायांचा पुतळा कोसळल्यावर विरोधी पक्षांनी भाजपा व महायुती सरकारवर निशाणा साधला. हे तर मोदी-शहांचे दलाल आहेत, असे आरोप झाले. राज्यात शाळेत जाणाऱ्या मुलीही सुरक्षित नाहीत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांचेही महायुती सरकारला संरक्षण करता येत नाही, अशी आगपाखड विरोधी पक्षांनी केली. महाराजांनी उभे केलेले गडकिल्ले साडेतीनशे वर्षे भक्कमपणे उभे आहेत. त्यांचीही देखभाल उत्तम प्रकारे सरकार करीत नाही.

पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश

सिल्लोड येथे ६० खाटांच्या स्त्री रुग्णालयास शासनाची मंजुरी

सिल्लोड (प्रतिनिधी) -, सिल्लोड येथे ६० खाटांच्या स्त्री रुग्णालयास शासनाने मंजुरी दिली आहे. राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री तथा पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांचा याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू होता . ना. अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश आले असून , लवकरच सिल्लोड येथे ६० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरू होईल. सार्वजनिक आरोग्य विभागाने या संदर्भातील सरकारी निर्णय जारी केला आहे. या स्त्री रुग्णालयामुळे सिल्लोड रेफरचे प्रमाण थांबणार असून सिल्लोड व जवळपासच्या गर्भवती महिलांना याचा लाभ होणार आहे.

सिल्लोड शहर हे जालना, बुलडाणा, जळगाव व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याच्या केंद्रबिंदू आहे. गर्भवती महिला तसेच इतर आजारांवर उपचार घेण्यासाठी महिला सिल्लोड ला येतात. सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात बऱ्याचवेळा प्रसूती साठी आलेल्या महिलांना अतिदक्षता व यासारख्या अधिकच्या सुविधांची आवश्यकता असते त्यासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे रेफर करण्यात येते. त्यामुळे ना. अब्दुल सत्तार यांनी सदरील समस्या पाहता सिल्लोड येथे स्त्री रुग्णालयासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले, शासनाने सिल्लोड येथे ६० खाटांच्या स्त्री रुग्णायाला मंजुरी दिली याबद्दल ना. अब्दुल सत्तार यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री तान्हाजी सावंत यांचे आभार मानले.

स्त्री रुग्णालयात असतील या सुविधा

बाह्यरुग्ण विभाग, आंतरुग्ण विभाग, माता व बाल संगोपन विभाग,तात्काळ, उपचार कक्ष, प्रयोगशाळा, प्रसुतीग्रुह,शस्त्रक्रिया ग्रुह, वाहन सुविधा (रुग्णवाहिका), नवजात अर्भक काळजी कोपरा, क्ष-किरण, न्याय वैद्यकीय प्रकरणे ,नेत्र तपासणी, कुटूंब कल्याण, शस्त्रक्रिया, लसीकरण व कुटूंब, कल्याण सुविधाबाबत समुपदेन, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रामंतर्गत आरोग्य सुविधा, मोठ्या व छोट्या शस्त्रक्रिया,एकात्मिक समुपदेशन व उपचार केंद्र, पालकांकडुन मुलांकडे संक्रमण प्रतिबंध उपचार केंद्र, रक्तपेढी व रक्त घटक विघटन केंद्र, फिजीओथेरेपी, अतिदक्षता विभाग, आहार

विभाग, दंत विभाग, मनोविकृती विभाग, जळीत विभाग,विशेष नवजात अर्भक काळजी कक्ष, शुश्रूषा केंद्र,ट्रौमा केअर युनिट

आ.सतीश चव्हाण यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार.

गंगापूर (प्रतिनिधी) - राष्ट्रकुल संसदीय मंडळ, म हाराष्ट्र शाखेतर्फे सन २०१९-२० करिता महाराष्ट्र विधान परिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कारासाठी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र विधान मंडळाचे मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या मा.सदस्यांची सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणार्या 'उत्कृष्ट संसदपटू' व 'उत्कृष्ट भाषण' या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये आ.सतीश चव्हाण यांची सन २०१९-२० करिता महाराष्ट्र विधान परिषद 'उत्कृष्ट संसदपटू' म्हणून निवड करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव तथा राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेचे सचिव जितेंद्र भोळे यांनी पत्राव्दारे कळविले आहे.

गंगापुर तालुक्यातील लासुरस्टेशन येथे पोळ्याचा बाजार फुलला

गंगापूर (प्रतिनिधी) - गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील रविवारचा आठवडी बाजारात शेतकऱ्यांचा सर्जा राजा असलेला बैलाचा सण अर्थात पोळा २ सप्टेंबर रोजी असल्याने बाजार शेतकऱ्यांनी खरेदीसाठी फुलला होता.

लासुर स्टेशनच्या आठवडी बाजाराला पंचक्रोशीतील चाळीस ते पन्नास खेडे जोडलेले आहे त्यामुळे ग्रामीण भागाच्या शेतकऱ्यांसाठी श्रावण महिन्यातील पोळा सण म्हणजे शेतकऱ्यांची दिवाळीच असते त्यांच्या शेतात मशागतीसाठी वापरल्या जाणाऱ्या बैलाच्या सजावटीसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग आढळून आली यात शेतकऱ्यांनी आज जोते,बेंगड,फ ुगे,हेंगुळ,कासरा, वेसण,चऱ्हाट,जु,गेरू,घागरम ाळा,मोऱ्हकी,घुगरू, पैंजण,घोगर,झुल,कोरडे रंग,माथा,गळपेंट,कव्हडीगेठा, क्रिसष्टल म ाळ,गोंडे,शेंब्या,हार,नाडा,घंटीमाळ,आदी साहित्याची खरेदी केली. दरम्यान या सजावटीच्या साहित्यात कमालीची दरवाढ झाल्याने मंदीचे सावटही खरेदीवर दिसून आले गेल्यावर्षीपेक्षा प्रत्येक साहित्यात वीस ते पंचवीस टक्के दरवाढ झाली आहे. बळीराजाने आपल्या सर्जा/राजासाठी सजावटीचे साहित्य रविवारी बाजारातुन खरेदी केले आहे.

शेतकरी पुत्र निलेश पवारची जलसंपदा विभागात निवड

कन्नड - (प्रतिनिधी) - तालुक्यातील मुंडवाडी येथील शेतकऱ्याचा म ुलगा निलेश पवार याची अमरावती येथे नुकत्याच पार पडलेले भरतीमध्ये जलसंपदा विभागात क्लार्क पदी निवड झाली आहे तीन वेळेस पदरात अपयश पडले मात्र जिद्दी, चिकाटी, मेहनत करून प्रयत्न सुरूच ठेवल्याने चौथ्या प्रयत्नात यशाला गवसणी घालण्यात निलेश ला यश मिळाले. निलेश चे आई वडील शेती करतात २०२४ च्या भरती मध्ये एक त्याची निवड झाली नोकरी साठी प्रयत्न सुरू असताना काही दिवस पत्रकारिता या क्षेत्रात काम करून वार्तांकन सुद्धा केले. जिद्द, चिकाटी आणि मेहनत या त्रिसूत्रीमुळे निलेश पवार हे महाराष्ट्र जलसपदा विभाग मध्ये परीक्षा २०२४ या परीक्षेत सर्वसाधारण प्रवर्गातून राज्यात ९२ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

उंडणगाव येथे रिक्षा युनियन तर्फे भंडाऱ्याचा कार्यक्रम

उंडणगाव (प्रतिनिधी) - रिक्षा युनियन तर्फे शुक्रवारी दरवर्षीप्रमाणे यंदाही सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव - उंडणगाव महाम ार्गावर असलेल्या शेख सुलतान बाबा (पिर) येथे (न्याज) भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी रिक्षा युनियन चे अध्यक्ष काशिनाथ लांडगे ,उपाध्यक्ष जाकीर पटेल, शिवसेना शाखाप्रमुख सय्यद नासेर, सय्यद बाबा, नईम शाह, ईश्वर सुरडकर, नासेर पठाण , अजिम पेंटर, आरिफ पठाण तोफीक पठाण, विलास घोरपडे, विष्णू जाधव, कैलास पाटील ,संतोष पाटील, संतोष लांडगे, प्रकाश सुरडकर, सुशील वाघ, वसीम शहा, वसीम झारेकर, अंबादास भिवसने, कृष्णा जाधव, बाबू पठाण, एन. डी .अहिरे, . शालिक लांडगे, गुड्डु शाह, दीपक लोखंडे, गणेश डफळ, विजू सोनवणे, सादिक मुल्लाजी, जहीर शहा, अलिम सहाब ,हारुन मौलाना, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.

उंडणगाव - सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथील बाजारपेठेत पोळा सणानिमित्त बैलाच्या सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्यांची दुकाने मोठ्या प्रमाणावर थाटली आहे. रविवारी हे साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांनी दुकानासमोर गर्दी केली होती(छाया -जाकेर पटेल, उंडणगाव)

कन्नडला मालवण घटनेच्या निषेधार्थ जोडे मारो आंदोलन

कन्नड (प्रतिनिधी) - मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी कन्नड शहरातील पिशोर नाका येथे शिवसेना ठाकरे गटाच्या वतीनेसदरील घटनेचा निषेध म्हणून आमदार उदयसिंग राजपूत यांच्या नेतृत्वाखाली कन्नड शहरात सरकार विरोधात घोषणा देऊन जोडे मारो आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी आ उदयसिंग राजपूत, तालुका प्रमुख संजय मोटे, तालुका संघटक डॉ. अण्णा शिंदे, शहर प्रमुख डॉ. सदाशिव पाटील, उप ता प्रमुख शिवाजी थेटे, सरपंच अशोक दापके,युवा सेना जिल्हाध्यक्ष उमेश मोकासे, युवा तालुका योगेश पवार, राम देशमुख, उपशहर प्रमुख सलमान शेख, हिंदराज लखवाल, विभाग प्रमुख प्रकाश काचोळे, उपविभाग प्रमुख उदय सोनवणे, माजी विभाग प्रमुख महेश सोळुंके, सय्यद साजिद अली,शेख अक्रम, शेखर असिफ, विश्वनाथ त्रिभवन, रवी राठोड, बाबासाहेब मोहिते, अफसर खान, भास्कर मोटे, अशोक निकम इत्यादी शिवसैनिक व शिवप्रेमी उपस्थित होते.

वाकला येथे बस पेटवण्याचा प्रयत्न

वैजापूर (प्रतिनिधी) -वैजापूर तालुक्यातील वाकला येथे अज्ञातांनी बस पेटवण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवार रोजी पहाटे साडे तीन वाजेच्या सुमारास घडली. यात चालक व वाहकाने प्रसंगवधान राखत तातडीने आग विझवत पुढील अनर्थ टाळला. याबाबत मि ळालेल्या अधिक माहितीनुसार वैजापूर आगाराची बस क्रमांक एम एच २० बी एल ३० ३७ ही वाकला येथे मुक्कामी असताना पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी सदरील बस पेटवण्याचा प्रयत्न केला. आग लागल्याची बाब कळताच चालक व वाहक यांनी तातडीने आग विझवली. या घटनेत गाडीचे एक टायर जळून नुकसान झाले आहे.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 29.08.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1) अनिल अंबादास पाटील 2) वनिता सुनील पाटील 3) सुनील अंबादास पाटील 4) अंबादास आबाजी मानकापे 5) सुनंदा अनिल पाटील	**परिशिष्ट -I** मालमत्तेच्या पत्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: प्लॉट क्र. 33, शिव ज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था लि. एन-6, सिडको औरंगाबाद महाराष्ट्र 431003 प्लॉट क्षेत्रफळ 252.00 चौ. मी. येथे स्थित. सीमा: पूर्व - प्लॉट क्र. 34; पश्चिम - प्लॉट क्र. 32; उत्तर - सोसायटी अंतर्गत रस्ता; दक्षिण - प्लॉट क्र. 30	AURHL19000094	20.08.2024	रु. 17,97,813.50/-	रु. 12,076,513.92/-	रु. 1,79,78,135.00	सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह.	07.10.2024 सकाळी 10 पासून ते दुपारी 12.

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **06/10/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **07/10/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **08/10/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. **नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स लिमिटेड, 1 ला मजला, रत्नप्रभा कॉम्प्लेक्स, जालना रोड, औरंगाबाद - 431001 आणि संतोशी संपर्क. नं.9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 02.09.2024
ठिकाण: औरंगाबाद

तुकोबांची शब्दरत्ने- १६८१



न मिळो खावया न वाढो संतान
परि हा नारायण कृपा करो -१

नियोजन हा ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्याचा आधारस्तंभ होय. म्हणूनच जवळपास प्रत्येक व्यक्ती आपली ध्येय, धोरणे, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करीत असतो. प्रसंगानुरूप किंवा आपल्या चुकीमुळे नियोजन चुकले किंवा त्त्याा बाधा आली तर म ाणूस ध्येय, उद्दिष्टाच्या साध्यतेपासून दुरावतो. संसारात अडकलेल्या जीवाची ध्येय, उद्दिष्ट व त्याासाठीचे नियोजन हे प्रामुख्याने स्व भोवती फिरते. त्याामुळे स्व ला बाधक ठरणारे घटक निर्माण झाले म्हणजे त्याचे नियोजन फिसकटते व ध्येय, उद्दिष्ट आपोआप संपुष्टात येतात. पण स्व भोवती न फिरणाऱ्या माणसांच्या बाबतीत असे घडत नाही. अशी माणसं दृढनिश्चयी असतात. कसलेही संकट आले किंवा अवघड अशी बाधा निर्माण झाली तरी हे लोक आपल्या ध्येयाच्या मार्गातून ढळत नाहीत. ज्याच्यावर त्यांची श्रध्दा आहे किंवा जे त्यांचे आदर्श आहेत, अशांकडे ते उद्दिष्टापर्यंत जाण्यासाठी मदत न मागता दृढनिश्चयी राहण्याचा आशीर्वाद म ागतात. समाजसेवेचे कंकण बांधलेले तुकाराम महाराज तर अशा दृढ निश्चयी लोकांचे शिरोमणीच आहेत. त्यांनी समाजसेवेचा विडाच उचलला होता. त्यांना समाजसेवेचे ध्येय पूर्णत्वास न्यायचे होते. आपणही त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्का करु या.

''जय जय राम कृष्ण हरी''

डॉ. विजयकुमार पं.फड
श्री माउलीनगर जालना,
भ्रमनध्वनी: 9422216448

Printed at Anand nagari prakashan pvt. ltd. A/14, additional M.I.D.C., Jalna & published by Ravindra Mishrilal Bangad on behalf of Anand nagari prakashan pvt. ltd. at Jyotimarya Complex, Block no. 5 & 32 Jalna road, Aurangabad (Maharashtra). Tel.: (0240) 2483911, Fax: 2481910, Editor: Ravindra Mishrilal Bangad*. (*Responsible for selection of news under P & RB act.). Jalna 13th year. E-mail: anandnagri@gmail.com. (All desputes under Jalna jurisdiction). It is not necessary to the editorial board that they agree with the opinions expressed through matter and articles published in this newspaper. RNI no. MAHMAR/2012/26780.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक आणि संपादक रवींद्र मिश्रीलाल बांगड* यांनी आनंद नगरी प्रकाशन प्रा.लि. ए/१४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., जालना येथे छापून कार्यालय ज्योतिर्मय कॉम्प्लेक्स गाळा क्रं. ५ व ३२ जालना रोड औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. फोन नं. ०२४०-२४८१८०९, २४८३९११ फॅक्स २४८१९१० औरंगाबाद वर्ष १३वे. (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे). ई मेल : anandnagri@gmail.com (सर्व वाद जालना न्यायालयाअंतर्गत) या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकूर व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. आरएनआय नं.एमएएचएमएआर/२०१२/२६७८०